ePaper

सलग सुट्ट्यांमुळे मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेवर गर्दी!



| वर्ष - 7 | अंक - 103 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- निराधार मुलांना मदतीची ‘सावली’
- सुष्मिता बनली डॉक्टर
- तृणमूलने ‘खुनी खेल खेला’ है!
- समृद्धी महामार्गावर दारु मिळते !


www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 14 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# भाजपासोबत ‘घरोबा’ कदापि नाही!

## » शरद पवार यांचे स्पष्टीकरण : अजित पवारांसोबतची भेट कौटुंबिक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भेटीनं राज्यातील राजकारणात पुन्हा काही हालचाली सुरू झाल्यात का असा प्रश्न सगळ्यांना पडला आहे. पुण्यातील व्यावसायिक अतुल चोरडिया यांच्या बंगल्यात काल शरद पवार आणि अजित पवार यांच्यात बैठक झाली. वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटीलही हजर होते. या भेटीबाबत कुणालाही काही कळवण्यात आले नव्हते. चांदणी चौकातील पूलाच्या उद्घाटनासाठी अजित पवारही पुण्यात होते. या कार्यक्रमानंतर कोरेगाव पार्क येथील चोरडिया यांच्या निवासस्थानी शरद पवार-अजित पवार यांच्यात भेट झाली.**



सदर भेटीवर राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे. शरद पवार देखील भाजपाला पाठिंबा देणार का?, एनडीएमध्ये सहभागी होणार का?, असे प्रश्न उपस्थित होत आहे. यावर आता स्वत: शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. काही लोक मला भाजपासोबत या, अशी विनंती करत आहे. मात्र राष्ट्रवादी पक्ष कधीच भाजपासोबत जाणार नाही. राष्ट्रवादीतील एक गट भाजपामध्ये गेला असला तरी मूळ पक्ष भाजपासोबत जाणार नसल्याचं शरद पवार यांनी स्पष्ट केलं आहे. सत्ताधारी पक्ष सत्तेचा गैरवापर करत आहे, सामान्य जनतेला हे आवडत नसून त्याचे परिणाम भविष्यात दिसतील, असा दावाही शरद पवारांनी केला आहे.

मुंबईच्या हयात हॉटेलमध्ये १ सप्टेंबर रोजी विरोधकांच्या इंडिया आघाडीची बैठक होणार आहे, यात पुढील रणनीतीविषयी चर्चा होणार असल्याचं शरद पवार म्हणाले. तसेच मणिपूरचा प्रश्न हा देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असल्याचं देखील शरद पवारांनी सांगितलं.

अजित पवारांसोबतच्या बैठकीवर कुटुंबातील व्यक्तीला भेटण्यात गैर काय? असं शरद पवारांनी म्हटलं आहे. अजित पवार हा माझा पुतण्या आहे आणि पवार कुटुंबातील मी वडिलधारा माणूसआहे, त्यामुळे मला कुणी भेटायला आलं किंवा मी कुणाला भेटायला बोलावलं, हा चर्चेचा विषय बनू शकत नाही, असं स्पष्टीकरण शरद पवारांनी दिलं.

### आमच्या निर्णयाला आशीर्वाद द्या...

» दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरद पवार यांच्यासोबत उरलेल्या आमदार, खासदारांनी आमच्यासोबत यावे. आमच्या निर्णयाला शरद पवार यांनी आशीर्वाद द्यावेत, या मागणीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवारांची भेट घेतल्याचे सांगण्यात येत आहे. आपण येणार नसाल तर पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे आणि अन्य खासदारांना तरी पाठवा, अशी गळ अजित पवार यांनी यावेळी घातली. या बैठकीची पूर्वकल्पना दिल्लीला होती. सगळ्या परिस्थितीवर दिल्लीचे वरिष्ठ नेते तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बारीक लक्ष ठेवून होते. पूर्वनियोजित आखणीनुसार हे चालू होते. अजित पवार पुन्हा एकदा शरद पवार यांना भेटतील. त्यावेळी कदाचित त्यांच्यासोबत प्रफुल्ल पटेलही असतील, असेही सांगण्यात येत आहे.

### शरद पवार यांना सोडून कुठेही गेलेलो नाही : दिलीप वळसे-पाटील

सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचा राजीनामा देऊ नये, यासाठी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनीच रोखले. वळसे-पाटील यांनीच याबाबतचा गौप्यस्फोट केला. ' हा प्रश्न व्यक्तिगत आहे, पण मला काम करायला सांगितले ही गोष्ट खरी आहे,' असे त्यांनी सांगितले. आम्ही शरद पवार यांना सोडून कुठेही गेलेलो नाही, ते आमचे नेते आहेत आणि राहतील, असेही त्यांनी संगितले.

# कळवा येथील रुग्णांच्या मृत्यूप्रकरणी कठोर कारवाई करणार!

## » आरोग्यमंत्री तानाजी सावंत : ठाण्यातील 17 रुग्णांचा मृत्यू ही दुर्दैवी घटना!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ठाणे महापालिकेच्या अखत्यारित येणाऱ्या कळवा येथील रुग्णालयात जी घटना घडली, ती अत्यंत दुर्दैवी आहे. अश्याप्रकारे रुग्णाच्या जीवाशी झालेली हेळसांड आम्ही अजिबात खपवून घेणार नाही, येत्या दोन दिवसात या प्रकरणाचा अहवाल येईल, अशी माहिती राज्याचे आरोग्यमंत्री प्रा डॉ तानाजी सावंत यांनी पुण्यात पत्रकारांशी बोलताना दिली आहे.**

ठाणे महापालिकेचे आयुक्त, आरोग्य अधिकारी यांच्याकडून याप्रकरणात नेमके काय घडलं हा विषय समजून घेऊ, त्यानंतर दोन दिवसात त्याचा अहवाल प्राप्त झाला की, त्यातील दोषींवर मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करून कठोर कारवाई केली जाईल, असेही आरोग्यमंत्री सावंत यांनी सांगितले. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीत ठाण्यातील सदर रुग्णालय येते.





परंतु, मृत्यू हा मृत्यूच असतो. रुग्णाच्या जिवाशी होणारी हेळसांड आम्ही काहीही झालं तरी सहन करणार नाही. या ठिकाणी काय घडलं त्याची माहिती आम्ही घेत आहोत. या रुग्णालयाच्या अधीक्षकांना याची कल्पना असेल. रुग्णांकडे दुर्लक्ष झालं आहे का? ही बाबही अहवाल आल्यावर स्पष्ट होईल. जी घटना घडली ती अत्यंत दुर्दैवी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात या अशा प्रकारच्या घटना घडणं सर्वसामान्यांच्या आरोग्याची हेळसांड करणं हे माझ्यासारखा मंत्री मुळीच सहन करणार नाही. ज्यावेळी अहवाल येईल त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने योग्य ती कारवाई केली जाईल.



“ घटना मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यात घडली की गडचिरोलीला घडली की चंद्रपूरला घडली यामध्ये कुणीही पडू नये. सगळे महाराष्ट्राचे नागरिक आहेत. त्यांची जबाबदारी ही शासनाची आहे. आम्ही शासन म्हणून जबाबदारी घेतली आहे. या घटनेच्या मुळाशी आम्ही जात आहोत. ज्या कुणामुळे घडलं असेल त्यावर कारवाई केली जाणारच आहे.

– **डॉ. तानाजी सावंत,** आरोग्यमंत्री.

# निराधार मुलांना मदतीची ‘सावली’

## » माजी उपहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांचा पुढाकार



। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिक्षणापासून वंचित असणाऱ्या निराधार मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पुणे महापालिकेचे माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी पुढाकार घेतला आहे. त्या अनुषंगाने पुण्यातील ताडीवाला रोड येथील सावली संस्थेतील १०० निराधार मुलांना त्यांनी शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप केले आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने (आठवले गट) पुण्यातील कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला.**

या वेळी सावली संस्थेचे अमित मोहिते, आरपीआयचे जेष्ठ नेते बाळासाहेब जानराव, माजी नगरसेवक अशोक कांबळे, मंदार जोशी, बाबुराव घाडगे, बसवराज गायकवाड आदींसह विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त १३२ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारण्याचा संकल्प डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी केला होता. येत्या शैक्षणिक वर्षापासून त्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली जाणार असल्याचा निर्धार देखील त्यांनी व्यक्त केला होता.

> “ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन मी माझे काम करतो. यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 132 व्या जयंतीनिमित्त 132 विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चाचा भार उचलण्याचा मी संकल्प केला होता. त्यानुसार विविध समाजातील गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक हातभार लावण्याचा मी छोटासा प्रयत्न करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून सावली संस्थेतील या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटत मला करावेसे वाटले. त्याचे मला समाधान आहे. शिक्षण घेतलेली विद्यार्थ्यांची पिढी घडली तर देश देखील समृद्ध झाल्याशिवाय राहणार नाही.
>
> **- डॉ. सिद्धार्थ धेंडे,** माजी उपमहापौर, पुणे महापालिका.

त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी हा उपक्रम आयोजित केला. ताडीवाला रोड येथील सावली संस्थेमार्फत फुटपाथवर फिरणारी मुले, अनाथ मुले यांचा सांभाळ करून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम केले जात आहे. या संस्थेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीत गती देण्यासाठी हा उपक्रम राबवल्याचे डॉ. धेंडे यांनी सांगितले. या वेळी आरपीआयचे जेष्ठ नेते बाळासाहेब जानराव म्हणाले की, आई वडिलांचे लहानपणीच छत्र हरविल्यानंतर मुलांचे आयुष्य भरकटले जाते. त्यांना शिक्षण, नोकरी, योग्य जगण्याचे मार्गदर्शन होत नाही. शिक्षणापासून मुले दूर झाली तर ती गैरमार्गाला लागण्याची शक्यता असते. तसेच देशाची प्रगती देखील खुंटते. त्यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा डॉ. धेंडे यांचा उपक्रम अतिशय महत्त्वाचा आहे. अनेकांनी हा उपक्रम हाती घेणे गरजेचे असल्याचे जानराव म्हणाले.

---


# स्वच्छतेचा नमो करंडक स्पर्धेचा न्यूयॉर्कमध्ये डंका

## » टाइम्स स्क्वेअर बिल बोर्डवर झळकले स्पर्धेच्या पर्वाच्या लोगो

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय जनता पार्टीचे धडाडीचे नेते गिरीश खत्री यांच्या स्वच्छतेचा नमो करंडक स्पर्धेचा न्यूयॉर्कमध्ये डंका पाहायला मिळाला. भारतातील पहिली स्वच्छतेच्या बाबतीतील अशी स्पर्धा असल्याने थेट टाइम्स स्क्वेअर बिल बोर्डवर स्पर्धेच्या तिसऱ्या पर्वाच्या लोगो अनवरणाचे दृश्य झळकले आहे. पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या उपस्थितीत नुकताच या स्पर्धेच्या लोगोच्या अनावरणाचा सोहळा पार पडला होता त्याची दृश्ये टाइम्स स्क्वेअर बिल बोर्डवर झळकली आहेत.**

संत गाडगेबाबा यांनी स्वच्छतेबाबत मोठी जनजागृती करण्याचे काम केले होते. हाच वसा पुढे नेण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारताचा नारा दिला आहे. हा नारा खऱ्या अर्थाने यशस्वी करण्यासाठी गिरीश खत्री हे प्रयत्न करत आहेत. यातूनच पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्ष आणि गिरीश खत्री मित्रपरिवाराच्या वतीने नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ‘ नमो करंडक स्पर्धा २०२३’या स्पर्धेचे सलग तिसऱ्या वर्षी आयोजन करण्यात आले आहे. गिरीश खत्री यांचे जे उपक्रम असतात ते अतिशय




भव्यदिव्य आणि अद्वितीय अशा स्वरूपाचे असतात. सातत्याने नाविन्यपूर्ण कल्पनांच्या माध्यमातून ते अनेक लोकाभिमुख असे अनेक उपक्रम राबवत असतात याच साठी त्यांचा कर्वेनगर आणि कोथरूड परिसरात लौकिक आहे. स्वच्छतेचा नमो करंडक हि स्पर्धा देखील अशी एक अभिनव अशी सपर्धा असून या स्पर्धेत प्रामुख्याने सोसायटी आणि अपार्टमेंटच्या स्वच्छतेवर अधिक भर दिला जातो. यानंतर तज्ञ परीक्षक त्या सोसायटीला प्रत्यक्ष भेट देवून परीक्षण करतात. यानंतर सर्वात स्वच्छ सोसायट्यांना बक्षीसदेत गौरव केला जातो. या स्पर्धेला आता मोठा प्रतिसाद मिळू लागला या स्पर्धेत पहिल्या वर्षी ४२ सोसायट्यांनी सहभाग नोंदवला होता तर या वर्षी तब्बल ९० सोसायट्या या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. आता तिसऱ्या पर्वात कमीत कमी २०० सोसायट्या सहभागी होतील असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

### अभियानाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश

» याबाबत बोलताना खत्री म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून एक स्वच्छतेचा संदेश दिला. आज आपण पाहतोय की या स्वच्छ भारत अभियानाने चळवळीचे स्वरूप धारण केले आहे. एका जनआंदोलनाच्या स्वरुपात हे सर्व सुरु आहे. स्वच्छतेचा संदेश तळागाळापर्यंत पोहचवणे हा या अभियानाचा उद्देश आहे आणि तोच उपक्रम किंवा त्याच माध्यमातून हे काम आम्ही पुढे नेत आहोत. ज्याप्रमाणे आपण गणेशोत्सव, नवरात्र उत्सव साजरे करतो त्याप्रमाणेच स्वच्छतेचा जागर व्हावा हीच यामागील संकल्पना आहे. आज आमच्या या स्पर्धेच्या तिसऱ्या पर्वाच्या लोगो अनवरणाचे दृश्य टाइम्स स्क्वेअर बिल बोर्डवर झळकणे हि निश्चितच आमच्यासाठी आनंदाची बाब आहे. आम्ही या स्पर्धेच्या माध्यमातून जो हेतू डोळ्यासमोर ठेवून काम करत आहोत त्याची अशा पद्धतीने जागतिक स्तरावर दखल घेतली जात असेल तर आमच्यासाठी ही बाब अभिमानास्पद आहे.

# "पॉवर गेम" साठी सावध पवित्रा!

## » पदाधिकाऱ्यांमध्ये संभ्रम : शरद पवार- अजित पवारांच्या भेटीने चर्चेला उधाण

।पिंपरी।महाईन्यूज।
प्रतिनिधी।

**शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पुण्यात शनिवारी (दि. 12) गुप्त बैठक झाल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. या चर्चांमुळे दोन्ही पवार एकच आहेत की वेगळे, याबाबत स्पष्टता नसल्याने पिंपरी-चिंचवड शहरातील राष्ट्रवादीचे कार्यकर्ते, पदाधिकारी मात्र चांगलेच संभ्रमात पडले आहेत. दोन्ही पवार भविष्यात एकत्र आल्यास आपली गोची होऊ नये, यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही आता सावध पवित्रा घेतला असल्याचे चित्र आहे.**




पुण्यातील दोनही पवारांच्या भेटीमुळे राज्याच्या राजकारणात आणखीन एक ट्विस्ट वाढला आहे. या भेटी बाबत उलट-सुलट चर्चा रंगल्या आहेत. एका बाजुला सत्तेत सहभागी होण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खा. शरद पवारांना विनवणी केली असल्याची चर्चा होत आहे. तर दुसरीकडे ही बैठक राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांच्या सत्तेत सहभागी होण्याबाबत तसेच ईडीकडून आलेल्या नोटिसीच्या बचावासाठी असल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीबाबत नंतर स्पष्टता येईल. मात्र गेल्या अनेक दिवसांपासून शरद पवार आणि अजित पवार यांच्यामध्ये सातत्याने होणाऱ्या बैठकांमुळे कार्यकर्त्यांची मात्र द्विधा अवस्था होत आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सत्तेतील सहभागानंतर पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीतील 90 टक्के पदाधिकाऱ्यांनी दादांच्या भूमिकेचे समर्थन केल्याचे चित्र आहे. काहींनी उघड भूमिका न घेता शांत राहण्याला पसंती दिली आहे. तर काही जण आम्ही पवार साहेबांसोबत म्हणत खा. शरद पवारांच्या गटासोबत गेले आहेत. सुरूवातीच्या काळात खा. शरद पवार यांच्या सांगण्यावरूनच अजित पवारांनी बंड केल्याची चर्चा होती. मात्र प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांना पक्षातून बडतर्फ केल्याची कारवाई केली. त्या वेळी पक्षामध्ये दोन गट खरेच पडले असल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर गव्हाणे यांना उपमुख्यमंत्री अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी त्वरीत शहराध्यक्ष पदावर नियुक्त केल्याचे पत्र देत प्रकरण सावरण्याचा प्रयत्न केला. दोन गटात वाद आहे हे चित्र स्पष्ट होत असतानाच पुन्हा संभ्रमाचे ढग दाटून आले आहे. खा. शरद पवार यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाने सातत्याने भेटी घेतल्या आहेत. पुण्यात देखील छुप्या पद्धतीने भेट झाली. त्यामुळे पदाधिकारी कोणती भूमिका घ्यावी असा सवाल करत आहेत. कोणतीही आक्रमक भूमिका घेऊन अडचणी वाढविण्यापेक्षा वेट ऍण्ड वॉच च्या भूमिकेत पदाधिकारी आहेत.



### माजी आमदार विलास लांडे यांची सावध भूमिका

» भोसरी विधानसभेचे माजी आमदार विलास लांडे यांनी राजकीय मुत्सुद्देपणा दाखवित सुरूवातीपासूनच सावध भूमिका घेतली आहे. स्वतः नेमके कोणत्या गटात आहेत, या बाबत उघड भाष्य लांडे यांनी केलेले नाही. पक्ष फुटीनंतर खा. शरद पवारांची भेट घेऊन त्यांच्यासोबत असल्याचा संदेश त्यांनी दिला. तर दुसरीकडे आपले चिरंजीव माजी नगरसेवक विक्रांत लांडे यांना अजित गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री अजित पवार गटासोबत ठेऊन दोन्ही नेत्यांची मर्जी सांभाळण्याचा प्रयत्न केला आहे.

### पदाधिकाऱ्यांनी आरोप-प्रत्यारोप टाळले

» राज्यात पवारांच्या भूमिकेचा अंदाज येत नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. भविष्यात राष्ट्रवादी पुन्हा एक झाल्यास उपमुख्यमंत्री अजित पवारांची नाराजीच नको म्हणून पिंपरीतील राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्याचे टाळले आहे. ऐकमेकांबाबत विरोधाची भाषा न वापरता सावध प्रतिक्रिया व्यक्त करताना कार्यकर्ते दिसत आहेत.

---

# 'हर घर तिरंगा' क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण!

## » माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांचा पुढाकार : नागरिकांना 5 हजार तिरंगा ध्वजाचे वाटप

।पिंपरी।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**देशाच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये अनेक ज्ञात-अज्ञात सैनिक, जवान, क्रांतिकारकांनी बलिदान दिले आहे. त्या घटनांची आठवण रहावी, तसेच देशभक्तीची जाज्वल भावना कायमस्वरूपी स्मरणात राहावी यासाठी हर घर तिरंगा हे अभियान महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी व्यक्त केले आहे. डोळे दीपविणाऱ्या इतिहासाचे अभिमानपूर्वक स्मरण करणे गरजेचे आहे. त्यासाठी 13 ते 15 ऑगस्ट दरम्यान प्रत्येक नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकवून देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्मांना आदरांजली अर्पण करावी, असे आवाहनही काटे यांनी केले आहे.**

माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे युथ फाउंडेशनच्या पुढाकाराने पिंपळे सौदागर, रहाटणी परिसरात हर घर तिरंगा अभियान मोठ्या उत्साहात राबविण्यात आले. या वेळी परिसरातील रहिवाशांना मोफत 5 हजार तिरंगा ध्वजाचे वाटप करण्यात आले. या वेळी नागरिकांना मार्गदर्शन करताना काटे बोलत होते.

या वेळी पिंपळे सौदागर, रहाटणी परिसरातील लहान मुले, स्त्रिया, जेष्ठ नागरिक आणि इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.





"देशाच्या स्वात्रंत्र्य लढ्यात अनेक शुर-वीरांनी अंगावर गोळ्या झेलून प्राणाची आहुती दिली. क्रांतिकारकांनी उभारलेल्या लढ्यामुळे ब्रिटिश राजवटीला देश सोडून जायला भाग पाडले. या क्रांतिकारकांच्या बलिदानाने, लढ्याने तिरंगा ध्वज आज अभिमानाने फडकत आहे. शहिदांच्या प्रति, देशाप्रती आपल्या मनात असलेली प्रेमभावना, आदर, निष्ठा व्यक्त करणे हा हर घर तिरंगा या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे काटे म्हणाले. तसेच 15 ऑगस्टला सूर्यास्तपूर्वी ध्वज व्यवस्थित उतरवून राष्ट्रध्वजाचा अवमान होणार नाही, या बाबतही काळजी घ्यावी.

- शत्रुघ्न काटे,
माजी नगरसेवक.

# दिल्लीच्या मंत्र्यांनी म्हणायचं ‘जी सचिवजी’!




**या आघातात संसदीय लोकशाही गंभीर जखमी झाली आहे. तिच्यासाठी दिल्लीमधील सव्वा तीन कोटी लोक प्रार्थना करत आहेत.. प्रातिनिधिक सरकार हा दिल्लीतील नागरिकांचा हक्क आहे. कारण १९९२ मध्ये, संसदेने त्यांची इच्छा मान्य केली आणि भारतीय राज्यघटनेत कलम २३९ एए समाविष्ट केले.**

तेव्हापासून, ‘राष्ट्रीय राजधानी प्रदेश (NCT) दिल्ली’च्या सरकारच्या वेळोवेळी निवडणुका होत आहेत. पहिली निवडणूक भाजपने जिंकली, तर नंतरच्या तीन निवडणुका काँग्रेसने. मदनलाल खुराना, साहिब सिंग वर्मा आणि सुषमा स्वराज हे तिघे भाजपचे मुख्यमंत्री (१९९३-९८) होते आणि शीला दीक्षित (१९९८-२०१३) काँग्रेसच्या मुख्यमंत्री होत्या. या चौघांनाही कलम २३९ एए अंतर्गत वेगवेगळ्या नायब राज्यपालांबरोबर काम करण्यात कोणतीही अडचण आली नाही. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीवर लक्ष ठेवून, तसेच काँग्रेस आणि नव्याने स्थापन झालेल्या आम आदमी पार्टी (आप) वर वरचष्मा मिळविण्यासाठी, भाजपने २०१३ च्या विधानसभा निवडणुकीत दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याचे वचन दिले. पण ही निवडणूक आपने जिंकली आणि भाजप पराभूत झाला. २०१४ मध्ये केंद्रातील सत्ता



मिळवल्यानंतर भाजपने दिल्लीवर नियंत्रण मिळवण्याचे ठरवले. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद २३९ एएचा केंद्र सरकारने लावलेला अर्थ नाकारला आणि खरे अधिकार नायब राज्यपालांकडे (२०१८) नाही, तर मंत्रिमंडळाकडे आहेत, हे स्पष्ट केले.

भाजप अर्थातच एवढ्या सहजासहजी हार मानणारा पक्ष नाही. त्यामुळे भाजपने ‘सेवांवर’ (म्हणजे सरकारी अधिकारी) नायब राज्यपालांचे नियंत्रण असल्याचा युक्तिवाद कायम ठेवला. ११ मे २०२३ रोजी, ‘सेवांवर’ ‘राष्ट्रीय राजधानी प्रदेश (NCT) दिल्ली’च्या सरकारला कायदेशीर आणि कार्यकारी अधिकार आहेत, हे सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा स्पष्ट केले. या निकालानंतर काही दिवसांतच केंद्र सरकारने ‘सेवांवर’ नियंत्रण ठेवण्यासाठी अध्यादेश जारी केला. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात त्याचे विधेयकात रूपांतर केले आणि दोन्ही सभागृहांत ते मंजूर झाले.

दिल्ली विधेयकावरील चर्चा अपेक्षित होती, तशीच झाली. भाजपने ‘घटनात्मकते’चा संकुचित अर्थ लावला आणि म्हटले की या विधेयकाने घटनेतील कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन केले नाही. अनेक कारणांमुळे हे विधेयक घटनाबाह्य असल्याचा विरोधकांचा युक्तिवाद होता. आता पुढे त्याचे काय होणार, ते आपण न्यायालयावरच सोपवावे हे बरे. माझ्या मते या संसदेतील या विधेयकावरील चर्चेत व्यापक मुद्दा विचारातच घेतला गेला नाही. सत्तेवर बसणारे सरकार कसे असावे याबद्दलचे इच्छित प्रारूप लष्करी हुकूमशाहीपासून (अलीकडचे उदाहरण, नायजर) ते एक-पक्षीय हुकूमशाही (चीन) किंवा अध्यक्षीय सरकार (अमेरिका) किंवा राष्ट्रपती-कम-संसदीय सरकार (फ्रान्स) ते बहु-पक्षीय सरकार (युरोपातील अनेक देशांमधील सरकार) किंवा लोकनियुक्त एकाधिकारशाही (हंगेरी) किंवा शुद्ध संसदीय लोकशाही (इंग्लंड) पर्यंत कोणतेही असू शकते. पण भारताने राज्यघटना स्वीकारली तेव्हा काय निवडले? तर आपण निःसंदिग्धपणे, वेस्टमिन्स्टर पद्धतीची संसदीय लोकशाही निवडली होती. संसदीय लोकशाहीचा पाया म्हणजे लोकांमधून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींमधून तयार झालेली संसद. एकेका मतदारसंघांचे प्रतिनिधित्व करणारे संसदेचे सदस्य, पंतप्रधानांसह मंत्रिमंडळ (किंवा मुख्यमंत्री) संसदेला (किंवा विधानसभेला) उत्तरदायी असते आणि संसद लोकांना उत्तरदायी असते. राज्यघटनेने इतर घटनात्मक संस्था उदा., सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग, लोकसेवा आयोग, इत्यादी निर्माण केल्या आहेत. सरकार चालवण्यासाठी सनदी सेवा ही गरजेची असते. त्यांना नियुक्त केले जाते आणि ते मंत्र्यांना उत्तरदायी असतात. या सगळ्यामध्ये राष्ट्रपती किंवा राज्यपालांची भूमिका काय असते? राष्ट्रपती किंवा राज्यपाल हे राज्याचे प्रमुख असतात.

## संपादकीय »

# पाकिस्तानातील अनागोंदी

***पाकिस्तानची नॅशनल असेंब्ली बरखास्त करण्याच्या सरकारी घोषणेमागे अनेक राजकीय अर्थ दडलेले होते.***

वास्तविक, शाहबाज शरीफ सरकारचा कार्यकाळ 12 ऑगस्टला संपणारच होता. ठरलेल्या वेळेत नॅशनल असेंब्ली बरखास्त होत असेल, तर घटनेनुसार दोन महिन्यांत निवडणुका घेणे क्रमप्राप्त ठरते; मात्र वेळेच्या अगोदरच नॅशनल असेंब्ली बरखास्त केल्याने निवडणुकीसाठी तीन महिन्यांचा कालावधी मिळतो. कारण, नॅशनल असेंब्ली बरखास्त करण्याची शिफारस 48 तासांत अध्यक्षांना मानावीच लागते. आरिफ अल्वी हे माजी पंतप्रधान इम्रान खान यांचे हितचिंतक असल्याने त्यांनी बरखास्तीसाठी 9 ऑगस्ट ही तारीख निवडली. यानुसार नॅशनल असेंब्ली लवकर बरखास्त होईल आणि निवडणुकीसाठी अधिक वेळ मिळेल, हा यामागचा हेतू! आणखी एक कारण म्हणजे, पाकिस्तानची आर्थिक स्थिती खूपच बिकट आहे आणि त्यास सांभाळण्यासाठी अनेक प्रकारची ओझी लादली जात आहेत.

**राजकारणी कितीही मुरलेला असो, त्यांच्या समोर बाकं रिकामी असतील तर बोलून काय फायदा? नाट्यगृह भरलेलं असेल तर कसलेल्या नाट्य अभिनेत्याच्या अभिनयाचं चीज होतं. पण, नाट्यगृहात ऐकायला-बघायला कोणी नसेल, फक्त विंगेतल्या सहकलाकारांसाठी अभिनय करायचा असेल तर ते म्हणतील नवीन काय? तालमीमध्ये तर तुमची प्रॅक्टिस बघितली आहे, अभिनयाचा कस लोकांपुढे लागेल.**

# राजकारण एक रंगमंच

मोदींच्या भाषणाचं नेमकं असंच झालं. मोदी त्यांच्या भाषणाची कसून तयारी करतात. या वेळी अविश्वास ठरावाच्या चर्चेत बोलायला तर मोदींनी गठ्ठेच्या गठ्ठे सोबत आणले होते. त्या कागदपत्रांचं ओझंच कित्येक किलो असेल. गठ्ठे उचलणाऱ्या कर्मचाऱ्याचे हात दुखले असतील. ‘मोदी.. मोदी’.. या घोषणांमध्ये त्यांचं सभागृहात आगमन झालं. मोदी बोलणार म्हणजे अडीच-तीन तासांचं जबरदस्त नाट्य पाहायला मिळणार, हे भाजपच्या सदस्यांनी गृहीत धरलेलं होतं. सभागृह अख्खं भरलं होतं. ज्यांना शालजोडीतील मारता येतील असे राहुल गांधी, सोनिया गांधी, अधीर रंजन चौधरी, सौगतदादा असे सगळेच दिग्गज कलाकार प्रेक्षागृहात बसले होते. मोदींच्या भाषणाची सुरुवातही तडाखेबंद झाली. आवाजातील चढउतार, संवादफेक, हालचाली, चेहऱ्यावरील हास्य हे पाहून विरोधी बाकांवरील सदस्यही प्रतिसाद देऊ



लागले. अधीर रंजन नेहमीप्रमाणे मध्ये मध्ये बोलू लागले. प्रयोग चढत गेला, दीड तास कधी-कसा उलटून गेला कोणाला कळलंही नाही. मग, विरोधी बाकांवरून चुळबुळ सुरू झाली. ‘मणिपूरवर या, मणिपूरवर या’ असे आवाज येऊ लागले. नाट्य अभिनेता जसा लाइट अंगावर घेऊन भारदस्त स्वगत बोलतो तसे मोदींनी कॅमेरे अंगावर घेतलेले होते. स्वगत सुरू असताना अचानक कोलाहल सुरू झाला, प्रेक्षागृहातून एक-एक उठून निघून जाऊ लागला. तेवढ्यात भाषणातून ‘मणिपूर’ असा आवाज ऐकू आला. ‘मणिपूर..’ शब्द प्रेक्षकांच्या कानावर पडला. पण, उशीर झाला होता. प्रेक्षक मागे वळले नाहीत. मग, अभिनेत्याला रिकाम्या प्रेक्षागृहात मणिपूरवर बोलावं लागलं. आवाज निस्तेज होत गेला. स्वगतातील गंमतही निघून गेली. विंगेत स्वपक्षीय जांभया देऊ लागले. इतकं सगळं घडत असताना, राजकारण म्हणजे एक रंगमंच असल्याची खात्री पटलेला एकच प्रेक्षक विरोधी बाकांवर अखेपर्यंत बसून होता तो म्हणजे सुनील तटकरे! एखाद्या लग्नकार्यामध्ये जशी लगबग असते तसं वातावरण लोकसभेत होतं. भाजपसाठी तो दिवस जणू मंगलकार्याचा होता. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी सभागृहात येणार हा भाजपच्या खासदारांसाठी भाग्याचा दिवस. या दिवसातील क्षण न् क्षण टिपण्याची ओढ त्यांच्या मनात दाटून आलेली होती. सभागृहाचं कामकाज दुपारी १२ वाजल्यापासून सुरू होतं. चारची वेळ जवळ आली तसं सभागृह भरू लागलं. सभागृहाच्या चारही बाजूंनी असलेल्या दारातून सदस्य आत येत होते.

## ।। अभंगवाणी ।।



न राहे रसना बोलतां आवडी ।
पायीं दिली बुडी माझ्या मनें ॥१॥

मानेल त्या तुम्ही अइका स्वभावें ।
मी तों माझ्याभावें अनुसरलें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# भाजपातर्फे राष्ट्रभक्तीचा जागर!

## » शंकर जगताप यांचा पुढाकार : वाल्हेकरवाडीत क्रांतिकारकांचा जिवंत देखावा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भाजपातर्फे पिंपरी-चिंचवड शहरात राष्ट्रभक्तीचा जागर करण्यात येत आहे. तिरंगा बाईक रॅली, क्रांतिकारकांचा जिवंत देखावा, देशभक्तीपर गितांच्या कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**



> "आपल्या राष्ट्राप्रती त्याग आणि समर्पणाचे प्रतिक म्हणजे भारतीय तिरंगा आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवात एकत्रितपणे ध्वज घरी आणणे हे केवळ तिरंग्याशी वैयक्तिक संबंधाचेच नव्हे, तर राष्ट्र उभारणीसाठी आपली वचनबद्धता आहे, ही भावना भारतीय नागरिकांमध्ये जागृत करणे ही या उपक्रमामागील कल्पना आहे. हर घर तिरंगा अभियानात सहभागी होऊन भारताला एक मजबूत आणि समृद्ध देश बनवण्यासाठी कटिबद्ध होवूया, असे आवाहन मी पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना करतो. वाल्हेकरवाडीतील क्रांतिकारकांच्या जिवंत देखाव्यामुळे धगधगत्या क्रांतिपर्वाचे स्मरण झाले.
> **– शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'हर घर तिरंगा' अभियान राबवण्यात येत आहे. या अभिभानांतर्गत वाल्हेकरवाडी येथे देशभक्तीपर गीते, क्रांतीकारकांचा जिवंत देखावा फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीचा शुभारंभ छत्रपती शिवाजी चौक येथे होऊन वाल्हेकरवाडी मार्गे सायली कॉम्प्लेक्स मार्गी ममता स्वीट - स्पाईन रोड येथे समारोप झाला. यावेळी माजी सभापती स्थायी समिती विलास मडगिरी, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, माजी नगरसेवक राजेंद्र गावडे, सुरेश भोईर, अभिषेक बारणे, चिंचवड विधानसभा प्रमुख काळुराम बारणे, चिंचवड किवळे मंडलध्यक्ष योगेश चिंचवडे, माजी स्विकृत सदस्य बिभीषण चौधरी, शहर उपाध्यक्ष भाजपा शेखर चिंचवडे, पाटीलबुवा चिंचवडे, जिल्हा कार्यकरणी सदस्य रविंद्र देशपांडे, विनोद मालु, चिंचवड किवळे मंडल युवा मोर्चा अध्यक्ष सन्नी बारणे, जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस प्रसाद कस्पटे, चिंचवड किवळे मंडल सरचिटणीस रविंद्र प्रभुणे आदी कार्यकर्ते, पदाधिकारी, मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. बाईक रॅली, प्रभातफेरी, पदयात्रा, विविध स्पर्धा, देशभक्तीपर गीत गायन असे विविध उपक्रम आयोजित केले आहेत. या निमित्त पिंपरी-चिंचवड भाजपाच्या वतीने शहरामध्ये ठिकठिकाणी अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. शहरातील नागरिकांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही जगताप यांनी केले.

# एका रात्रीत 18 रुग्णांचा मृत्यू

## » ठाणे पालिकेच्या रुग्णालयातील प्रकार

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यातून धक्कादायक माहिती समोर आली आहे.ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात एका रात्रीत तब्बल 18 रुग्णांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. प्रचंड अनागोंदी, गोंधळ, अपुरी डॉक्टर क्षमता आणि रुग्णांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ यामुळे एकच रात्री 18 जणांनी आयुष्य गमावले. मृत्यू झालेल्या 18 पैकी 13 रुग्ण हे आयसीयूमधील होते.**




### 10 ऑगस्ट रोजी पाच रुग्णांचा मृत्यू

» तीनच दिवसांपूर्वी ठाणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या अनागोंदी कारभार समोर आला होता. वेळेत उपचार न मिळाल्याने रुग्णालयातील पाच जणांचा मृत्यू झाल्याची बाब समोर आली. यामध्ये एका रुग्णाचा हृदयविकाराच्या झटक्याने, उलटी झाल्याने एका रुग्णाचा, एक अज्ञात आणि एका रुग्णाच्या पायाला गळू झाला होता. तर एका गरोदर मातेचे मृत्यू झाला होता.

रुग्णालय प्रशासनाने या बातमीला दुजोरा दिला असून, काही रुग्ण प्रायव्हेट हॉस्पिटलमधून शेवटच्या क्षणी आल्याने तर काही रुग्ण 80 पेक्षा जास्त वयाचे असल्याने मृत्यू झाल्याचे सांगितले आहे. मात्र सिव्हिल रुग्णालय बंद झाल्यापासून ठाणे जिल्ह्यातील सर्व रुग्ण इथेच येत असल्याने डॉक्टर आणि वैद्यकीय यंत्रणा कमी पडत असल्याची स्थिती आहे.

याआधी 10 ऑगस्ट रोजी एकाच दिवशी पाच जणांचा मृत्यू झाला होता. त्यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड आणि इतर पक्षांनी रुग्णालयात जाऊन आंदोलन केले होते.

आता केवळ रात्री 10.30 पासून सकाळी 8.30 पर्यंत 18 जणांचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ठाणे जिल्हा, मुख्यमंत्र्यांची ठाणे महानगरपालिका, त्यात असलेली वर्षानुवर्षांची सत्ता आणि त्याच महानगरपालिकेचे हे छत्रपती शिवाजी हॉस्पिटल, त्याच रुग्णालयात एकाच रात्री 18 रुग्णांना आपले प्राण गमवावे लागणं ही अतिशय धक्कादायक बाब आहे.

गेल्याच महिन्यात मुख्यमंत्र्यांनी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाण्यात सुपर स्पेशलिटी कॅन्सर रुग्णालयाचे भूमिपूजन केले होते, तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयाची इमारत पाडून त्या ठिकाणी देखील मल्टीस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यात येत आहे, मात्र हे करत असताना सर्वात जुने छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय दुर्लक्षित झाले आहे का असा प्रश्न निर्माण होत आहे.

# धक्कादायक! समृद्धी महामार्गावर दारु मिळते!

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**समृद्धी महामार्ग सुरु झाल्यापासून या महामार्गावर अपघातांची मालिका सुरु आहे. हजारावर अपघात होऊनही आणि दीडशेच्या वर जीव जाऊनही अद्यापही प्रशासनाला जाग आलेली दिसत नाही. मद्यपान करुन वाहन चालवण्यावर बंदी असतानाही चक्क समृद्धी महामार्ग लगत असलेल्या अवैध हॉटेलमध्ये दारुची अवैध विक्री होत असतानाचा धक्कादायक प्रकार कॅमेरात कैद झाला आहे.**

नागपूर ते मुंबई असलेला समृद्धी महामार्ग स्वप्नवत वाटावा असाच आहे. मात्र हा महामार्ग सुरु झाल्यापासून या ना त्या कारणाने चर्चेत राहिलेला आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे या महामार्गावर होत असलेल्या दररोजच्या अपघातांमुळे शेकडो जीव जात असताना प्रशासनाने यावर ठोस पावले उचलण्याऐवजी फक्त तात्पुरते उपाय करत असल्याचं वास्तव समोर आलं आहे.

कारण गेल्याच महिन्यात एक तारखेला झालेल्या एका खाजगी बसच्या अपघातात 25 जणांचा जळून कोळसा झाला होता. तपासांती या खाजगी बसच्या चालकाने मद्यपान केलं असल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. त्यानंतर प्रशासनाने अनेक उपाययोजना हाती घेतल्याचा दिखावा केला, मात्र प्रत्यक्षात प्रशासनाने कुठलीही उपाययोजना केली तरी एक नवीन समस्या समोर येत असल्याचं वास्तव आज एबीपी माझ्याच्या कॅमेऱ्याने कैद केलं आहे. समृद्धी महामार्गावर चक्क मेहकरजवळ असलेल्या पेट्रोल पंपाच्या आजूबाजूला असलेल्या अवैध छोट्या हॉटेल्सवर वाहन चालकांना दारु विक्री केली जात आहे. ही अवैध दारु विक्री निरपराध प्रवाशांच्या जीवावर बेतणार हे माहित असूनही प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. सरकारला सामान्यांच्या जीवाशी काहीही घेणं देणं नाही. सरकार आपल्याच मस्तीत मश्गूल असल्याचं सामान्य नागरिकांचे म्हणणं आहे.

# तृणमूलने ‘खुनी खेल खेला’ है!

## » तुम्ही देश कसा चालवणार : ममता बॅनर्जी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालमधली परिस्थिती सांगत असताना ममता सरकारवर टीका केली. पंचायत निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने “खुनी खेल खेला है..” असं वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं होतं. त्या टीकेला पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी उत्तर दिलं आहे.**

तुम्ही अशा पद्धतीने देश कसा काय चालवणार असा प्रश्न आता ममता बॅनर्जींनी विचारला आहे.. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अकारण पश्चिम बंगालला बदनाम करत आहेत. बंगालच्या लोकांनी कधीही विभाजनच्या राजकारणासमोर गुडघे टेकले नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लोकांना माणुसकी जपण्याचा संदेश द्यायला हवा होता. मात्र त्यांनी पश्चिम बंगालची बदनामी करायचं ठरवलं आहे. इथे येऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी फक्त इथल्या भाजपा नेत्यांना खुश केलं. इथे येऊन





मोदींनी बंगालचा अपमान केला असं ममता बॅनर्जींनी म्हटलं आहे. ममता बॅनर्जी म्हणाल्या, “मणिपूर १०० दिवसांपासून जळतं आहे.

जर पंतप्रधान नरेंद्र मोदी मणिपूरसारख्या छोट्या राज्यात कायदा-सुव्यवस्था राखू शकत नाही तर देश कसा चालवणार? जर ते बंगालला बदनाम करत राहिले आणि विभाजनाचं राजकारण करत राहिले तर देश कसा चालवणार? ” असे सवाल ममता बॅनर्जींनी विचारले आहेत.

२०२१ मध्ये तुम्ही बंगालमध्ये हरलात, भाजपाचा २०२१ मध्ये पराभव झाला. त्यानंतर पंचायत निवडणुकांमध्येही पराभव झाला. मात्र तुम्ही हे कधी स्वीकारणार? असा प्रश्नही ममता बॅनर्जी पंतप्रधानांना विचारला आहे. भाजपात दहशतादी कारवाया वाढल्याचं तुम्ही म्हणता, पण हे सगळं सुरु कुणी केलं?

### लोकशाहीची हत्या कुणी केली ?

» भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनीही ममता बॅनर्जींवर जोरदार टीका केली. देशात लोकशाही रुजवण्याचं काम कुणी केलं असेल तर ते नरेंद्र मोदी आहेत. मात्र लोकशाहीची हत्या कुणी केली असेल तर ते ममता बॅनर्जींनी केली आहे असंही नड्डा म्हणाले होते. त्यानंतर ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींर टीका करत उत्तर दिलं आहे.

---

# लाल किल्ल्यावर फुल ड्रेस रिहर्सल

## » स्वातंत्र्यदिनी 1800 पाहुण्यांना आमंत्रण

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या स्वातंत्र्य दिनाला २ दिवस बाकी आहेत. दरम्यान, रविवारी सकाळी श्रीनगरमध्ये तिरंगा यात्रा काढण्यात आली. ज्यामध्ये एलजी मनोज सिन्हा यांनी दल लेक येथे झालेल्या कार्यक्रमात भाग घेतला. त्याचवेळी दिल्लीतील लाल किल्ल्यावर स्वातंत्र्य दिनापूर्वी फुल ड्रेस रिहर्सल झाली. ज्यामध्ये लष्कराच्या सर्व तुकड्यांनी भाग घेतला. मंगळवारी स्वातंत्र्याचा ७७ वा वर्धापन दिन साजरा होणार आहे.**



यावेळी 1800 विशेष पाहुणे मुख्य कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. यामध्ये सरपंच, शिक्षक, परिचारिका, शेतकरी, मच्छीमार यांचा समावेश असेल. जम्मू-काश्मीरमध्ये लष्करानेही सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे. लष्कराने शनिवारी पुंछच्या देगवार सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेवर गस्त घातली. याव्यतिरिक्त, जिल्हा प्रशासन अनंतनाग, नगरपालिका समिती, जम्मू-काश्मीर पोलीस, स्थानिक शाळा आणि CRPF यांनी 'मेरी माटी मेरा देश' मोहिमेची सर्वात मोठी रॅली काढली.

दिल्ली पोलिसांनी फुल ड्रेस रिहर्सलसाठी 8 मार्गांसाठी ट्रॅफिक ॲडव्हायझरी जारी केली आहे. यामध्ये नेताजी सुभाष मार्ग, लोथियन रोड, एसपी मुखर्जी मार्ग, चांदणी चौक रोड, निषाद राज मार्ग, एस्प्लॅंड रोड आणि लिंक रोड, राजघाट ते ISBT, आयपी फ्लायओव्हर आणि आऊटर रिंग रोड रात्री 11 वाजेपर्यंत बंद ठेवण्यात आले आहेत. लष्कर आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या परेडच्या तालीमसाठी पहाटे ४ वाजल्यापासून सर्वसामान्यांसाठी बंद करण्यात आला होता. स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी ‘हर घर तिरंगा’ मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले. पंतप्रधान मोदींनी तिरंग्याला राष्ट्रीय एकात्मता आणि स्वातंत्र्याचे प्रतीक म्हटले आणि लोकांना तिरंग्यासोबतचे त्यांचे फोटो हर घर तिरंगा वेबसाइटवर अपलोड करण्यास सांगितले.

### लाल किल्ल्यावर यावेळी काय विशेष

» यावेळी 1800 विशेष पाहुणे मुख्य कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. यामध्ये सरपंच, शिक्षक, परिचारिका, शेतकरी, मच्छीमार, सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पात काम करणारे कामगार, खादी क्षेत्रातील कामगार, राष्ट्रीय पुरस्कार विजेते शिक्षक, बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनचे कर्मचारी यामध्ये सहभागी होणार आहेत. याशिवाय अमृत सरोवर प्रकल्प आणि हर घर जल योजनेत मदत करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही आमंत्रित करण्यात आले आहे. कृषी मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्राच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या 2 लाभार्थ्यांनाही लाल किल्ल्यावर बोलावण्यात आले आहे.

---

# माझ्या नावाचा गैरवापर थांबवा : वाड्रा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांनी केंद्रीय मंत्री स्मृती इराणी नकारात्मक राजकारण करत असल्याचा आरोप केला आहे. वाड्रा म्हणाले- स्मृती इराणींनी त्यांच्या नावाचा गैरवापर थांबवावा. वाड्रा यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले- स्मृती इराणी संसदेत गौतम अदानींसोबत माझा फोटो दाखवत होत्या. मी अदानींसोबत काही चूकीचे केली असेल तर त्याचा पुरावा द्या.

मणिपूर जळत आहे, महिलांवर अन्याय होत आहे. त्याबद्दल बोलत नाही. मी खासदार नाही, तरीही माझ्याबद्दल चर्चा करतात. मी राजकारणापासून दूर राहतो, पण जेव्हा सत्ताधारी पक्ष माझे नाव एखाद्या प्रकरणात ओढतात तेव्हा मला बोलण्यास भाग पडते. गौतम अदानी यांच्यासोबत पंतप्रधानांचीही छायाचित्रे आहेत. याबद्दल आपण प्रश्न का विचारू नये? यावर राहुल गांधी यांनी संसदेत अनेक प्रश्न विचारले, पण त्यांना उत्तर मिळाले नाही. स्मृती जी, तुमच्या आणि तुमच्या कुटुंबाशी संबंधित इतरही अनेक वाद आहेत. स्मृती इराणी यांचे गोव्यात रेस्टॉरंट आहे. तुमच्या पदवीवरही अनेक वाद आहेत. आधी तुम्ही त्यावर खुलासा करा आणि मग इतरांकडे बोट दाखवा. सोनिया गांधी यांचे जावई रॉबर्ट वाड्रा यांनी त्यांच्या पत्नी प्रियंका गांधी यांचे कौतुक केले आहे की त्यांच्याकडे संसदपटू होण्यासाठी सर्व पात्रता आहेत. प्रियंका गांधी यांनी संसदेत यावे, त्या उत्तम काम करतील, असे वाड्रा म्हणाले. ते पुढे म्हणाले - ती संसदेत गेली तर मला आनंद होईल. मला आशा आहे की काँग्रेस पक्ष त्यांचा स्वीकार करेल आणि त्यांच्यासाठी चांगला प्लॅन करेल.

वाड्रा यांनी विरोधी आघाडी भारतावरही भाष्य केले. ते म्हणाले- 2024 मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत विरोधी आघाडी भारत भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला कडवी झुंज देईल यावर मला पूर्ण विश्वास आहे 9 ऑगस्ट रोजी लोकसभेत अविश्वास प्रस्तावावरील चर्चेदरम्यान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उद्योगपती गौतम अदानी यांचे नाव घेतले होते. प्रत्युत्तरात स्मृती इराणी म्हणाल्या होत्या- ते कधीपासून अदानी-अदानी करत आहेत, आता मीही थोडं बोलायला हवं. माझ्याकडेही फोटो आहे.

# कंगनाने सनी देओलला मॅनली हिरो म्हटले



कंगना रणौतने सनी देओल स्टारर 'गदर 2' या चित्रपटाचे कौतुक केले आहे. अभिनेत्रीने शनिवारी तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवरून 'गदर 2' च्या स्क्रिनिंगच्या बाहेर उभ्या असलेल्या प्रचंड गर्दीचे व्हिडिओ शेअर केले. यासोबतच कंगनाने सांगितले की, हा चित्रपट एकट्याने प्रदर्शित झाला असता तर पहिल्या दिवशी 65 ते 70 कोटींची कमाई केली असती. 'गदर 2' सोबतच अक्षय कुमार आणि पंकज त्रिपाठी स्टारर 'OMG 2' देखील रिलीज झाला आहे. 'OMG 2' ने पहिल्या दिवशी 10.26 कोटी रुपयांचा गल्ला जमवला आहे. तर 'गदर 2' ने 40 कोटींची कमाई केली. कंगनाने या चित्रपटाचे कौतुक करताना लिहिले, 'चित्रपटाने माफिया राजकारणाशिवाय, खरेदी केलेल्या रिव्ह्यूशिवाय, बनावट प्रचाराशिवाय, कॉर्पोरेट बुकिंगशिवाय, मोठ्या प्रमाणात तिकिटे खरेदी केल्याशिवाय आणि कार्टून दिसणाऱ्या कलाकारांशिवाय चांगली कामगिरी केली आहे. योग्य मर्दानी नायक आणि योग्य वस्तुमान सामग्री. यासोबत कंगना म्हणाली, 'शुक्रवारी रिलीज होऊनही चित्रपटाने चांगली कामगिरी केली आहे. यामुळे लोकांच्या जीवनात उत्साह आणि राष्ट्रवाद परत आला आहे. 'OMG 2' शी टक्कर झाली नसती तर 65 ते 70 कोटी रुपये सहज ओपनिंग मिळाली असती. कंगनाने काही दिवसांपूर्वी एक गोष्ट शेअर केली होती की गदर 2 या वर्षातील सर्वात मोठा ओपनर ठरेल. मात्र, तसं झालं नाही तर ओपनिंग डे 40 कोटींच्या कलेक्शनसह चित्रपटाला वर्षातील दुसरी सर्वात मोठी ओपनिंग मिळाली. कंगनापूर्वी सलमान खाननेही या चित्रपटाचे कौतुक केले आहे. या चित्रपटाच्या रेकॉर्डब्रेक ओपनिंगबद्दल सलमानने सनी देओलचे अभिनंदन करणारी पोस्ट शेअर केली होती. त्यांनी लिहिले, 'अडीच किलोचा हात म्हणजे चाळीस कोटींच्या ओपनिंग बरोबर. सनी पाजींनी बंड घडवले. 'गदर 2' च्या संपूर्ण टीमचे अभिनंदन.

सनी देओल स्टारर आणि अनिल शर्मा दिग्दर्शित, या चित्रपटात अमिषा पटेल, मनीष वाधवा आणि उत्कर्ष शर्मा प्रमुख भूमिकेत होते.

## जॅकलिनला लव्ह लेटर



जॅकलिन फर्नांडिसचा वाढदिवस होता. ठग सुकेशने तिला पत्राद्वारे वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सुकेशच्या वकिलांनी शुक्रवारी सकाळी हे पत्र जारी केले. सुकेश जॅकलीनला सांगतो की तिला कशाचीही काळजी करण्याची गरज नाही.

सुकेशने वचन दिले की तो जॅकलिनचा पुढचा वाढदिवस तिच्यासोबत साजरा करेल. सुकेशने जॅकलिनसाठी भेटवस्तू पाठवल्याचं दिसतंय. कारण त्याने आपल्या पत्रात भेटवस्तूंचाही उल्लेख केला आहे. हाताने लिहिलेल्या पत्रात सुकेश म्हणाला - तुझा वाढदिवस माझ्यासाठी सर्वात खास दिवस आहे. तुझा वाढदिवस माझ्या वाढदिवसापेक्षा मोठा वाटतो. आपण दररोज अधिक सुंदर होत आहात. मी तुला किती मिस करतोय याची तुला कल्पना नाही. मी तुला मिठी मारायचो, केक वाटायचो. मी तुला फुलं गिफ्ट करायचो, हे सगळं करताना मी खूप मिस करत आहे. जरी मला आशा आहे की मी पाठवलेली भेट तुम्हाला आवडेल. प्राण्यांच्या सुरक्षेसाठी तु जे पाऊल उचलते, आणि हे केल्याने तुला जो आनंद मिळतो, तो सोन्या-चांदी किंवा कोणत्याही महागड्या वस्तूंतून मिळू शकत नाही. सुकेशने जॅकलिनला भेटवस्तू पाठवल्याचं सुकेशच्या पत्रावरून दिसून येत आहे. त्याने याआधीही जॅकलिनला महागडे घोडे आणि मांजरी भेट दिले आहेत. बेबी गर्ल तुला माहित आहे मी तुझ्यासाठी कोणत्याही थराला जाईन. माझे तुझ्यावर प्रेम आहे बाळा, हसत राहा. तुला माझ्यासाठी काय आणि किती अर्थ आहे हे तुला चांगलंच माहीत आहे. तुझ्यावर प्रेम आहे माझ्या

## जवानाच्या क्लिप लीक

शाहरुख खानच्या आगामी 'जवान' या चित्रपटाच्या काही क्लिप लीक झाल्या होत्या. आता शाहरुखची प्रॉडक्शन कंपनी रेड चिलीज एंटरटेनमेंटने याबाबत एफआयआर दाखल केला आहे. 10 ऑगस्ट रोजी माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत ही एफआयआर नोंदवण्यात आली. क्लिप लीक करणे हे कॉपीराइटचे उल्लंघन असल्याचे प्रॉडक्शन कंपनीचे म्हणणे आहे. क्लिप लीक झाल्यामुळे चित्रपटाची गुप्तता संपते. चित्रपटात अनेक गोष्टी दडलेल्या आहेत. ही एक रणनीती आहे. अशा परिस्थितीत रिलीजपूर्वी क्लिप आऊट झाल्यामुळे चित्रपटाच्या मार्केटिंगवर परिणाम होतो. फ्री प्रेस जर्नलमधील वृत्तानुसार, निर्मिती कंपनीने मुंबईतील सांताक्रूझ पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल केला आहे. प्रोडक्शन कंपनीचे म्हणणे आहे की क्लिप लीक झाल्यामुळे अभिनेत्याचा लुक आणि चित्रपटाच्या संगीताचा अंदाज येऊ शकतो. या सर्व गोष्टी उघड केल्या जात नाहीत. जवानांच्या क्लिप लीक होण्याची ही पहिलीच वेळ नाही. एप्रिलमध्येही या चित्रपटाशी संबंधित दोन लीक व्हिडिओ समोर आले होते. पहिल्या क्लिपमध्ये शाहरुखचा फाईटिंग सीक्वेन्स होता. दुसरी क्लिप डान्स सीक्वेन्सची होती, ज्यामध्ये शाहरुख आणि नयनतारा दिसत होते.

## सुहानाने गरीब महिलेला दिले 1000 रुपये

शाहरुख खानची मुलगी सुहाना खान काल रात्री तिची आई गौरी खानसोबत स्पॉट झाली.दोघीही बुक लॉन्च इव्हेंटमध्ये सहभागी झाल्या होत्या. यादरम्यान एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये सुहाना एका गरीब महिलेला पैसे देताना दिसत आहे. आता सुहानाचे औदार्य पाहून चाहते तिचे खूप कौतुक करत आहेत. व्हिडिओमध्ये सुहाना एका रेस्तरॉमधून बाहेर पडताना दिसत आहे. तिने काळ्या रंगाचा ड्रेस घातला आहे, ज्यामध्ये ती खूपच ग्लॅमरस दिसत आहे. दरम्यान, एक महिला सुहानाकडे पैसे मागण्यासाठी येते. त्यानंतर सुहानाने तिच्या पाकिटातून 500-500 च्या दोन नोटा काढून तिला दिल्या. यानंतर ती गाडीत बसून निघून गेली. तिच्या या कृतीमुळे इंटरनेटवर चाहत्यांची मने जिंकत आहे. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'ती खूप गोड मनाची मुलगी आहे.





सुष्मिता सेनला नुकतीच डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. तिचे वडील शुभीर सेन यांनी दीक्षांत समारंभाच्या मंचावर जाऊन मुलीचा सन्मान स्वीकारला. सुष्मिताने नुकतीच एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये तिने दीक्षांत समारंभाचा भाग का होऊ शकली नाही हे सांगितले. त्यामुळे तिच्या वडिलांनी जाऊन तिचा सन्मान केला. अभिनेत्रीने दीक्षांत समारंभाशी संबंधित एक व्हिडिओ शेअर करताना आपला आनंद व्यक्त केला आहे. सुष्मिता म्हणाली की, हे नेहमीच माझ्या वडिलांचे स्वप्न होते. स्टेजवर त्यांचा सन्मान होताना पाहून सुष्मिताला खूप आनंद झाला आहे. या अभिनेत्रीचा व्हिडिओ सोशल मीडियावर खूप चर्चेत आहे. सुष्मिता सेनला पश्चिम बंगालच्या टेक्नो इंडिया युनिव्हर्सिटीमधून डी.लिट ही पदवी देण्यात आली होती. सुष्मिताने पोस्टमध्ये लिहिले- मोठा सन्मान! मला डी.लिटचा सन्मान दिल्याबद्दल टेक्नो इंडिया युनिव्हर्सिटी आणि श्री नारायणमूर्ती जी यांचे खूप खूप आभार. कोलकाता येथे माझ्या वतीने डॉक्टरेट स्वीकारणारे माझे वडील शुभीर सेन यांनी विद्यापीठातील सर्व प्राध्यापकांचे खूप कौतुक होते. दीक्षांत समारंभ किती छान होता हे त्यांनी मला सांगितले. मला हा सन्मान दिल्याबद्दल तुम्हा सर्वांचे मनापासून आभार. सुष्मिताने तिच्या आवाजातील एक व्हिडिओ क्लिप शेअर केली, त्यामध्ये तिने दीक्षांत समारंभाला उपस्थित न राहण्याचे कारण सांगितले. ती म्हणाली- नमस्कार, मी तुम्हा सर्वांची माफी मागू इच्छिते, कारण मी या दीक्षांत समारंभाचा भाग होऊ शकले नाही. खरंच, मला तुम्हा सर्वांना प्रत्यक्ष भेटायचे होते. डॉक्टरांनी मला आराम करण्याचा सल्ला दिला होता, त्यामुळे मी सत्कार समारंभात सहभागी होऊ शकले नाही. दीक्षांत समारंभात आलेले प्रमुख पाहुणे श्री नारायणमूर्ती यांचे खूप खूप आभार. मी नेहमीच तुमची फॅन राहिली आहे. दीक्षांत समारंभात मला तुमचे भाषण ऐकायचे होते. मला तुम्हाला भेटायचे होते. तो अजूनही माझ्या बकेट लिस्टचा एक भाग आहे.

## सुष्मिता बनली डॉक्टर

# भारत चौथ्यांदा बनला चॅम्पियन!

## » मलेशियावर 4-3 ने विजय : आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी विजय

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारतीय हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद पटकावले आहे. संघाने मलेशियाचा 4-3 असा पराभव केला. या स्पर्धेत भारतीय संघ चौथ्यांदा चॅम्पियन बनला आहे. यासह भारत या स्पर्धेतील सर्वात यशस्वी देश ठरला आहे.**

शनिवारी चेन्नईच्या राधाकृष्णन स्टेडियमवर 5 वी फायनल खेळणारी टीम इंडिया हाफ टाईमपर्यंत 2 गोलने पिछाडीवर होती. तेव्हा स्कोअर लाइन 3-1 होती. त्यानंतर सामन्याच्या शेवटच्या दोन क्वार्टरमध्ये भारतीय खेळाडूंनी तीन गोल करत विजय मिळवला. सामन्यात जुगराज सिंगने 9 व्या मिनिटाला, कर्णधार हरमनप्रीत सिंगने 45 व्या मिनिटाला, गुरजंत सिंगने 45 व्या मिनिटाला आणि आकाशदीप सिंगने 56 व्या मिनिटाला गोल केले. तसेच, मलेशिया संघाकडून अझराई अबू कमालने 14 व्या मिनिटाला, रहीम राझीने 18 व्या मिनिटाला आणि महंमद अमिनुद्दीनने 28 व्या मिनिटाला गोल केले. दोन्ही संघांनी सामन्याची आक्रमक सुरुवात केली. दोन्ही संघांनी गोलच्या संधी निर्माण केल्या. मलेशियाने सुरुवातीच्या मिनिटांत आघाडी घेण्याचा प्रयत्न केला, पण भारतीय बचावफळीने शानदार बचाव केला.

त्यानंतर 9व्या मिनिटाला भारताला पहिला गोल मिळाला. जुगराज सिंगने पेनल्टी कॉर्नरचे रुपांतर करून भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. काही वेळानंतर 14व्या मिनिटाला मलेशियाच्या अजराई बाबू कमलने 14व्या मिनिटाला मैदानी गोल करत स्कोअर 1-1 असा केला. या क्वार्टरमध्ये झालेल्या दुहेरी गोलमुळे हाफ टाइमपर्यंत मलेशियाने 3-1 अशी आघाडी घेतली होती.

संघाने सुरुवातीपासूनच भारतीय बचावफळीवर दबाव टाकण्यास सुरुवात केली. इकडे मलेशियाचे खेळाडू पीसी (पेनल्टी कॉर्नर) शोधत होते. त्याला 18व्या मिनिटाला यश मिळाले. येथे रहिम राझीने ड्रॅग फ्लिकवर गोल केला.

दुसऱ्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघांना १-१ ग्रीन कार्ड मिळाले म्हणजेच खेळाडूंना 2-2 मिनिटे केमिकल सस्पेंशन मिळाले. भारतीय संघाने क्वार्टरच्या शेवटच्या मिनिटांत आक्रमक खेळ केला आणि वर्तुळात अनेक संधी निर्माण केल्या, पण संघ गोल करण्यात अपयशी ठरला.

28व्या मिनिटाला मलेशियाला पेनल्टी कॉर्नर मिळाला, त्याचे मोहम्मद महमुद्दीनने गोलमध्ये रुपांतर केले. हाफ टाईम 3-1 ने पिछाडीवर पडल्यानंतर भारतीय संघाने तिसऱ्या क्वार्टरमध्ये जोरदार पुनरागमन केले. यामध्ये संघाने दोन गोल करत स्कोअर लाइन 3-3 अशी बरोबरी साधली. 36व्या मिनिटाला कार्ती सेल्वमने पेनल्टी कॉर्नरवरून गोल करण्याचा प्रयत्न केला पण जुगराज सिंगचा ड्रॅग फ्लिक पोस्टवर गेला.

अशा स्थितीत मलेशियाने आघाडी कायम राखण्याचा विचार केला आणि चेंडू स्वतःकडे ठेवण्याचा प्रयत्न केला. मलेशियाने बचावात्मक खेळ करत भारतीय वर्तुळात काही संधी निर्माण केल्या. शेवटच्या क्वार्टरमध्ये आणि सामन्याच्या 45व्या मिनिटाला भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंगने पेनल्टी स्ट्रोकवर अप्रतिम गोल केला.

त्यानंतर काही सेकंदात गुरजंत सिंगने मैदानी गोल करत भारताला बरोबरी साधून दिली. भारतीय संघाने शेवटच्या क्वार्टरमध्ये शानदार खेळ केला. त्याची सुरुवात 3-3 अशी झाली.

अशा परिस्थितीत आघाडीचा खेळाडू आकाशदीप सिंगने ५६व्या मिनिटाला मनदीप सिंगच्या पासवर गोल करत सामना भारताच्या बाजूने वळवला. शेवटच्या चार मिनिटांत मलेशियाच्या खेळाडूंना बरोबरीचा गोल करता आला नाही आणि ट्रॉफी भारताकडे गेली.



### जपानने तिसऱ्या क्रमांकाचा सामना जिंकला

» अंतिम फेरीपूर्वी दक्षिण कोरिया आणि जपान यांच्यात तिसऱ्या स्थानासाठीचा सामना खेळला गेला. यामध्ये जपानने दक्षिण कोरियाचा 5-3 असा पराभव केला. पूर्वार्धात दोन क्वार्टरपर्यंत 3-3 अशी बरोबरी होती, पण नंतरच्या दोन क्वार्टरमध्ये जपानने सामन्यात आघाडी घेतली.

# जैस्वालचा यशस्वी धमाका!

## » भारताने चौथा टी-20 सामना जिंकला

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारताने चौथ्या टी-२० सामन्यात वेस्ट इंडिजचा ९ विकेट्सने पराभव केला. त्याचबरोबर पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत २-२ अशी बरोबरी साधली. आता रविवारी निर्णायक सामना होणार आहे. टीम इंडियाने वेस्ट इंडिजने दिलेले लक्ष्य १७ षटकांत केवळ १ गडी गमावून पूर्ण केले. भारताकडून सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि शुबमन गिल यांनी चमकदार कामगिरी केली. यशस्वी जैस्वालने सामन्यानंतर कर्णधार हार्दिक पंड्या आणि सपोर्ट स्टाफचे आभार मानले. यासोबतच त्याने सामन्याबाबत आपली प्रतिक्रिया दिली.**

चौथ्या सामन्यातील नाबाद खेळीनंतर यशस्वी जैस्वाल म्हणाला, "हे माझ्यासाठी सोपे नव्हते. मी मैदानावर गेलो आणि माझ्या हिशोबाने खेळलो याचा मला आनंद आहे. मी सपोर्ट स्टाफ आणि हार्दिक भाई (कर्णधार हार्दिक पंड्या) यांचे आभार मानू इच्छितो. त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला, हे मला खूप प्रभावित करते. मी संघाच्या गरजेनुसार खेळतो आणि झटपट धावा काढण्याचा प्रयत्न करत होतो. आपल्या खेळीबद्दल बोलताना यशस्वी जैस्वाल म्हणाला, "मी पॉवरप्लेमध्ये खेळण्यास सक्षम आहे, मी संघाला चांगल्या ठिकाणी नेण्याचा प्रयत्न केला. सामन्यादरम्यान परिस्थितीनुसार खेळणे खूप महत्त्वाचे असते. मी धावा करण्याचा प्रयत्न करत होतो. आयपीएलमध्ये मी जेसन होल्डर आणि मॅककॉय यांचा खूप सामना केला आहे. यामुळे मला खूप मदत झाली आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध्या चौथ्या टी-२० सामन्यात यशस्वी आणि गिलने बॅटने जोरदार फटकेबाजी केली. या दोन्ही फलंदाजांनी लॉडरहिलमधील सर्व कॅरेबियन गोलंदाजांचा जोरदार समाचार घेतला. दरम्यान, यशस्वी जैस्वालने ५१ चेंडूत ११ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने नाबाद ८४ धावा केल्या.




### 9 गडी राखून जिंकला चौथा सामना

» लॉडरहिल येथे खेळला गेलेला चौथा टी-२० सामना भारतीय संघासाठी 'करो या मरो' असा होता. पण टीम इंडियाने येथे चांगली कामगिरी करत १८ चेंडू आणि नऊ विकेट्स राखून विजय मिळवला. या सामन्यात विरोधी संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना आठ गडी गमावून १७८ धावा केल्या होत्या.

# लक्ष्मण आयर्लंड दौऱ्यावर जाणार नाही

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

व्हीव्हीएस लक्ष्मण टीम इंडियासोबत आयर्लंड दौऱ्यावर कोचिंग स्टाफचे प्रमुख म्हणून जाणार नाही. टीम इंडिया तीन सामन्यांच्या T20I मालिकेसाठी 15 ऑगस्टला डब्लिनला रवाना होणार आहे. संघाचे नेतृत्व जसप्रीत बुमराहकडे असेल. राहुल द्रविड आणि त्यांचा प्रशिक्षक संघ सध्या वेस्ट इंडिजविरुद्ध्या मालिकेसाठी अमेरिकेत असून, आयर्लंडविरुद्ध्या मालिकेसाठी ते संघासोबत प्रवास करणार नाहीत, त्यामुळे लक्ष्मण कोचिंग स्टाफची जबाबदारी सांभाळेल, अशी शक्यता वर्तवली जात होती.

मात्र, राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे (एनसीए) प्रमुख या दौऱ्यात सहभागी होणार नसल्याचे आता उघड झाले आहे. त्याऐवजी, सितांशु कोटक आणि साईराज बहुतुले सारखे काही इतर प्रशिक्षक सपोर्ट स्टाफचा भाग असतील. वेस्ट इंडिज दौऱ्यानंतर टीम इंडिया आयर्लंडमध्ये आयर्लंडविरुद्ध टी-20 मालिका खेळणार आहे. ही मालिका 18 ऑगस्टपासून सुरू होणार आहे. तिन्ही टी-20 सामने मालाहाइडमध्ये खेळवले जातील. जसप्रीत बुमराह जवळपास वर्षभरानंतर टीम इंडियात पुनरागमन करत आहे. पाठीच्या दुखापतीनंतर तो एनसीएमध्ये पुनर्वसन प्रक्रियेतून जात होता. बुमराहच्या पाठीवरही न्यूझीलंडमध्ये शस्त्रक्रिया झाली. बुमराहने 25 सप्टेंबर 2022 रोजी हैदराबादमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध शेवटचा सामना खेळला होता.

जसप्रीत बुमराह (कर्णधार), ऋतुराज गायकवाड (उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, तिळक वर्मा, रिंकू सिंग, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), जितेश शर्मा (यष्टीरक्षक), शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, शाहबाज अहमद, रवी बिश्नोई, कृष्णा, रवी बिश्नोई, प्रसिद्ध अर्शदीप सिंग, मुकेश कुमार आणि आवेश खान.